**मोटार अपघात क्र. १६/२०२४ मधील नि.क्र.१३ वरील आदेश**

(घोषित दि. ०९/०६/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करणेसाठी दाखल केलेला आहे.

अर्जाची थोडक्यात हकीकत पुढील प्रमाणे –

२. प्रस्तुतचा मूळ अर्ज अर्जदार यांनी त्यांना अपघातात झालेल्या दुखापतीमुळे कायमचे अपंगत्व आले असल्यामुळे नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी अपघातग्रस्त गाडी बोलेरो पिकअप क्रमांक एमएच–०९–एफएल/१२७९ चे मालक संभाजी शिवाजी मस्के हे मयत आहेत व त्यांची वारस त्यांची पत्नी श्रीमती राणी संभाजी मस्के ही आहे. तरी त्याप्रमाणे निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्त करणेस परवानगी मिळावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर सामनेवाले क्र.३ यांचे विद्वान विधिज्ञ श्री. आर.जी.परुळेकर यांनी म्हणणे दाखल केले. त्यांचे म्हणणेनुसार अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जात नमूद विधाने खोटी आहेत. तसेच संभाजी शिवाजी म्हस्के यांच्या सर्व कायदेशीर वारसांना पक्षकार केल्याशिवाय अर्ज चालणे जोगा नाही. तरी अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली.

४. अर्जदार व सामनेवाले यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. विमा कंपनीने प्रकरणाचे कामी कैफियत देवून अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रस्तुच्या दुरुस्तीमुळे मूळ अर्जाचे स्वरुपामध्ये कोणताही नवीन बदल होत नाही. सदरची दुरुस्ती अर्जाचे अंतिम निराकरण होण्यासाठी योग्य व आवश्यक आहे. त्यामुळे अर्जाचा गुणदोषावर निर्णय

होणेसाठी अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे दुरुस्ती मंजूर करणे योग्य व न्यायाचे आहे. प्रस्तुत दुरुस्ती मंजूर केल्यास सामनेवाले विमा कंपनी यांचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश देणेत येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करणेस त्यांना परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी १४ दिवसांचे आत निशाणी क्र.१ मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत सादर करावी. तसे न केल्यास सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANTOSH TRIBHUWONNATH TRIPATHI
Date: 2026.06.09 17:55:43 +0530

दि. ०९/०६/२०२६

( एस.टी.त्रीपाठी )
सदस्य
मोटार अपघात न्यायाधीकरण,
सिंधुदुर्ग – ओरोस.